महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. 22 /प्रनिप्रा/968    दिनांक : 06/04/2020

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राजय तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, **दिनांक १९ मार्च, २०२० रोजी सकाळी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या १५ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु,**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड | .... | सदस्य |
| २) | **डॉ.के.डी.चव्हाण,**<br>कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | .... | सदस्य |
| ३) | **डॉ. अभय वाघ,**<br>संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य | .... | सदस्य |
| ४) | **श्री.संदीप कदम (भा.प्र.से),**<br>सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य. | .... | सचिव |

१) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, सदस्य तथा कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. धनराज माने, सदस्य तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ३) श्री. विश्वजीत माने, (भा.प्र.से.) सदस्य तथा सदस्य सचिव व महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी बैठकीस उपस्थित राहणार नसल्याचे कळविले होते, या अनुषंगाने नोंद घेण्यात आली.

२) प्राधिकरणाच्या उक्त बैठकीत बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे.



6/5

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या **दिनांक १९ मार्च, २०२०** रोजीच्या बैठकीचे विषयनिहाय इतिवृत्त खालील प्रमाणे आहे,-

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | **भाग – ०१ (निर्णयासाठी)** | |
| १. | दिनांक १५, १६, १७, १८, २२, २३, २४ आणि दि.२९ व ३० जानेवारी, २०२० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकांचे इतिवृत्त सादर करणे. | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.१५, १६, १७, १८, २२, २३, २४ आणि दि.२९ व ३० जानेवारी, २०२० रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृतांची नोंद घेण्यात आली. |
| २. | यापुर्वी दिनांक २५ ऑक्टोंबर, २०१९ रोजी व त्यानंतरच्या बैठकांमधील निर्णयावील खालील प्रलंबित मुद्दयांवरील कार्यवाहीचा अहवाल बैठकीपुढे ठेवणे.<br>**अ)** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क) यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मधील कलम, १६ (४) मध्ये प्राधिकरणाचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडण्याची तरतुद आहे. सबब उक्त नमुद सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या माहितीनुसार सद्यस्थितीमध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष/प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मुदत ठेवी राष्ट्रीकृत बँकेमध्ये वर्ग केल्यास एकंदरीत किती आर्थिक नुकसान होणार याबाबतचा सविस्तर अहवाल प्राधिकरणास सादर करणे तसेच अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष बँक खाते राष्ट्रीकृत बँकेमध्ये असणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. | **अ)** या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली, विशेषत: HDFC या बँकेत असलेल्या ठेवी 'Non withdrawal' आहेत व त्या विहित कालावधी पूर्वी तोडल्यास काहीच व्याज मिळणार नाही व पूर्णपणे अर्थिक नुकसान होईल. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी नमूद केले की या FD's मुदतपूर्व तोडल्यास रु. २,७७,४७,८०२/-, तसेच AXIS बँकेतील FD's मुदतपूर्व तोडल्यास रु. १९,५७,९०३/- नुकसान होऊ शकते.<br><br>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ज्या ठेवी राष्ट्रीकृत बँकेव्यतिरीक्त इतर बँकेमध्ये गुंतवल्या आहेत अशा सर्व प्रकारच्या ठेवी त्या मुदतपूर्व काढल्यामुळे होणाऱ्या नुकसानीचा विचार न करता एक आठवडयाच्या कालावधीत काढुन घेऊन त्या शासनाच्या निर्णयाप्रमाणे व महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या तरतुदींनुसार राष्ट्रीकृत बँकेमध्ये गुंतविण्यात याव्यात.<br><br>त्याचप्रमाणे यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करुन राष्ट्रीकृत बँकेव्यतिरीक्त अन्य बँकेमध्ये ठेवीची गुंतवणुक केली त्या अधिकाऱ्याकडुन याबाबतचा खुलासा घेण्यात यावा. |
| | **ब)** देशातील अस्तित्वात असलेली प्रवेश नियामक प्राधिकरणे तसेच राज्यातील प्राधिकरणे यांनी दैनंदिन कामकाजाबाबत अंमलात आणलेली रेग्युलेशन यांचा अभ्यासक करुन प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या कार्यपध्दतीची रेग्युलेशन तयार करावी. या संदर्भात विविध प्राधिकरणाच्या कार्यालयांना भेटी देऊन त्यांच्या रेग्युलेशनबाबतची माहिती घेण्यात यावी. तसेच तत्कालिन समितीने याबाबत तयार केलेल्या रेग्युलेशनबाबतचा मसुदा प्राधिकरणाच्या सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्यात | **ब)** प्रवेश नियामक प्राधिकरणाचे विनियमन मसुदा तयार करण्यासाठी दि.२२/०१/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये गठीत केलेल्या समितीने एक महिन्याच्या कालावधीत मसुदा तयार करण्याची कार्यवाही करावी.<br>त्याचप्रमाणे इतर राज्यातील प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करण्यासाठी देशामध्ये अशी किती प्राधिकरणे कार्यरत आहेत त्याबाबतची माहिती घेऊन ती मा.अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करावी. |



615

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
| --- | --- | --- |
| ३. | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या सार पोर्टलबाबत प्रक्रियेदरम्यान असंख्य अडचणी निर्माण होऊन विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. म्हणुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाशी संबंधित प्रवेश प्रक्रियेची सार पोर्टलवरील काम थांबविण्यात येऊन सदर काम मे.सिंथेसिस व फोर पिलर या दोन एजन्सीकडे सुपूर्त करण्यात आले होते. सदर एजन्सीने प्रवेश प्रक्रियेचे काम पुर्ण झाल्यानंतर सादर केलेल्या देयकांसंदर्भात तत्कालिन आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी आक्षेप घेऊन याबाबत विधानमंडळाची सत्यशोधन समिती समोर चौकशी करुन तद्नंतर देयके अदा करावी असे अभिप्राय नस्ती क्र.तांशिप्र-१२१९/प्र.क..../सीईटी वर नमुद केले आहेत. त्यानुसार या प्रकरणी प्राधिकरणाचे सदस्य श्री.गायकर, माजी कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली Fact Finding Committee गठीत करुन सदर समितीमध्ये कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषीविषय शिक्षण व संशोधन, पुणे आणि संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचा सदस्य म्हणून समावेश करावा.<br>सदर समितीने खालील बाबींवर अहवाल सादर करावा.<br>a) सदर प्रकरणाची विस्तृत छाननी करुन उणीवाबाबात आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय दयावेत.<br>b) भविष्यात असे होऊ नये यासाठी उपाय योजना सुचविणे.<br>c) विविध अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविलेल्या मे.सिंथेसिस व फोर पिलर तसेच मे.कल्प टेक्नॉलॉजी या एजन्सीकडून प्राप्त झालेल्या देयकांचे प्रदान करण्याबाबत विचार करणे.<br>d) तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातींची देयके अदा करण्याबाबत विचार करणे. | विषयामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या सार पोर्टलच्या अनुषंगाने प्रक्रिये दरम्यान निर्माण झालेल्या अडचणीच्या परिस्थितीत तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाशी संबंधित प्रवेश प्रक्रियेचे सार पोर्टलवरील काम थाबविण्यात येऊन सदरचे काम मे.सिंथेसिस व मे.फोर पिलर या दोन एजन्सीकडे सुपूर्त केल्यानंतर त्यांच्याकडुन प्राप्त झालेल्या देयकासंदर्भात तत्कालिन आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नमूद केलेल्या शेऱ्यानुसार सदर प्रकरणाची वस्तुस्थिती पडताळण्यासाठी प्राधिकरण स्वायत्त असल्याने प्राधिकरणाची अंतर्गत समिती स्थापन करण्यात येत आहे. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे सदस्य डॉ. गायकर, माजी कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, तंत्रशास्त्र विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली Fact Finding कमिटी गठीत करण्यात येत असुन सदर समितीत कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन, पुणे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे. सदर समितीने खालील बाबींवर आपला अहवाल तीन आठवडयात प्राधिकरणास सादर करतील.<br>१. या प्रकरणाची विस्तृत छाननी करुन उणीवाबाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय दयावेत.<br>२. भविष्यात असे प्रसंग उद्भवु नयेत यासाठी उपाय योजना सुचविणे.<br>३. विविध अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविलेल्या मे.सिंथेसिस व मे.फोर पिलर तसेच मे.कल्प टेक्नोलॉजी या एजन्सीकडुन प्राप्त झालेल्या देयकांचे प्रदान करण्याबाबत विचार करणे.<br>४. तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातींची देयके अदा करण्याबाबत विचार करणे.<br>५. वरील बाबी व्यतिरिक्त उपसमितीला योग्य वाटतील असे योग्य मुद्दे विचारात घेता येतील.<br>समितीने याप्रकरणी सुचना/अभिप्राय देताना मे. कल्प टेक्नोलॉजी या एजन्सीच्या कामासंदर्भात त्यांच्याकडक सुपूर्त केलेल्या इतर कामाप्रकरणी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण यांना आलेल्या अडचणीदेखील विचारात घ्याव्यात. |



615

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| ४. | व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या उमेदवारांच्या माहितीचे सात्मीकरण (Integration) करण्यासाठी महाआयटीला प्रवेश प्रक्रियेचा डाटा शेअर करण्यास मान्यता देणे. | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उच्च शिक्षण विभागाच्या ०८ व तंत्रशिक्षण विभागाच्या १२ व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उमेदवारांच्या माहितीचे सात्मिकरण (Integration) करण्यासाठी महा आयटीच्या विनंतीनुसार त्यांना डेटा उपलब्ध करण्याच्या संदर्भात विस्तृतपणे माहिती घेऊन फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा. |
| ५. | DATA Backup Policy च्या प्रारुपाला मंजुरी देण्याबाबत. | कार्यालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आणि प्रवेश नियामक प्राधिकरणाचा प्रवेश परीक्षा आणि प्रवेश मान्यतेसंदर्भातील डेटा जतन करुन ठेवण्यासाठी डेटा बॅकअप पॉलिसी लागू करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या सदस्यांनी बैठकीदरम्यान केलेल्या सर्व सुचनांचा समावेश करुन डेटा पॉलिसी करण्याच्या प्रस्तावास संमती देण्यात येत आहे. |
| **भाग - ०२ (माहिती तथा सहमतीसाठी)** | | |
| १. | शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये संचालक तंत्रशिक्षण यांच्या अखत्यारितील व्यवस्थापन (MBA) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी असोसिएशनने घेतलेल्या "आत्मा" प्रवेश परीक्षेचे बोगस गुणपत्रक सादर करुन प्रवेश घेतल्याचे निर्दशनास आलेल्या २९ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची संचालक तंत्रशिक्षण यांच्याकडून करण्यात आलेली कार्यवाही. | कार्यालयाने विषयाच्या अनुषंगाने सादर केलेल्या प्रस्तावावर सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात प्राधिकरणाच्या सचिवांनी सविस्तर माहिती बैठकीत सादर केली. त्या अनुषंगाने प्राधिकरणाचे सदस्य व संचालक, तंत्रशिक्षण यांनी याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची विस्तृत माहिती देताना बैठकीस अवगत केले की, आत्मा प्रवेश परिक्षेची बोगस गुणपत्रके सादर करुन प्रवेश घेतलेल्या २९ विद्यार्थ्यांचे प्रवेश तंत्रशिक्षण संचालनालयाने रद्द केले आहेत तसेच संबंधित विद्यार्थ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.<br>या विषयाच्या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण आणि संचालक, तंत्रशिक्षण यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने या संदर्भात संचालक, तंत्रशिक्षण यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन त्यास प्राधिकरणाची संमती देण्यात येत आहे तसेच पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.<br>१. बोगस गुणपत्रके दाखल करुन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर संचालक, तंत्रशिक्षण यांनी फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. सदर गुन्हयांच्या अनुषंगाने संबंधित पोलिस यंत्रणेने केलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल घेण्यात यावा व तो प्राधिकरणाला सादर करावा.<br>२. ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी न करता बोगस गुणपत्रके सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिले आहेत अशा महाविद्यालयांनी/ संस्थांनी खुलासा दोन आठवडयाच्या कालावधीत प्राधिकरणास सादर करावा.<br>३. सन २०१८-१९ या वर्षाची एम.बी.ए. प्रवेश प्रक्रिया |

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
| --- | --- | --- |
| | | चालु असताना बोगस गुणपत्रिका सादर केलेल्या विद्यार्थ्यांची कागदपत्र पडताळणी/तपासणी ज्या एफ.सी व ए.आर.सी केंद्रावरील नियुक्त कर्मचाऱ्यांनी केली आहे. त्या कर्मचाऱ्यांकडुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही का करण्यात येउ नये याबाबतचा खुलासा घेण्यात यावा. |
| २. | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी अभ्यासक्रमनिहाय निश्चित केलेला प्रवेश प्रक्रियेचा कार्यक्रम. | सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठीचा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने निश्चित केलेला अभ्यासक्रमनिहाय प्रवेश प्रक्रियेचा तपशिलवार कार्यक्रमाचे प्राधिकरणाने अवलोकन केले व या संदर्भात पुढीलप्रमाणे सुचना केल्या.<br>१. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने निश्चित केलेला सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचा प्रवेश प्रक्रिया कार्यक्रमाचा तपशिल सोबत जोडलेल्या **<u>प्रपत्र - अ</u>** नुसार आणि सदर परीक्षा कोणत्या केंद्रावर आयोजित केली जाणार आहे त्या केंद्रांची यादी प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने तात्काळ उपलब्ध करुन दयावी.<br>२. परीक्षा चालू असताना प्राधिकरणाचे सदस्य परीक्षा केंद्रांना भेटी देणार आहेत. त्यामुळे त्यांना प्राधिकरणाच्या सही शिक्क्याचे ओळखपत्र देण्यात यावे. |
| ३. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी अभ्यासक्रमनिहाय नियुक्त केलेल्या एजन्सी सोबत करण्यात आलेले सामंजस्य करार. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा व केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियुक्त केलेल्या सेवा पुरवठादार/एजन्सी यांची तपशिलवार माहिती प्राधिकरणाचे सचिव तथा आयुक्त यांनी बैठकीत सादर करताना स्पष्ट केले की, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा व केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्तापूर्वक होण्यासाठी सदर काम कोणत्या सेवा पुरवठादारास/एजन्सीला देण्यात यावे. याकरिता कार्यालयांतर्गत दिनांक १३/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये समिती गठीत केली होती.<br>या समितीने सादर केलेला अहवाल आणि केलेल्या सुचना व शिफारसीनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश परीक्षा आणि केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेच्या कामासाठी मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील ज्या संस्थांनी काम केले आहे. अशा संस्थांपैकी मे.कल्प टेक्नोलॉजी वगळता सेवापुरवठादार/एजन्सी यांची नियुक्ती करण्याचा निर्णय कार्यालयाने घेतला व त्यांच्या समवेत विहित कार्यपध्दतीनुसार सामंजस्य करार करण्यात आले आहेत.<br>सन २०१९-२० या वर्षी नियुक्त केलेली मे.कल्प टेक्नोलॉजी या एजन्सीला वगळयाच्या संदर्भात |



615

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | सचिवांनी स्पष्ट केले की, सदर एजन्सीने ज्या अभ्याक्रमांच्या प्रवेश परीक्षा आणि प्रवेश प्रक्रियेचे काम केले आहे त्या अभ्यासक्रमांची नोडल एजन्सी संचालक, उच्च शिक्षण, पुणे तसेच संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी मे.कल्प टेक्नोलॉजी यांचे काम समाधानकारक नव्हते व त्या एजन्सीच्या पोर्टलमुळे संचालनालयास बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या होत्या व गैरसोयीचे झाले होते असे लेखी कळविले होते. शिवाय संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश परीक्षेचे काम मे.कल्प टेक्नोलॉजी यांना देण्यात येऊ नये असे स्पष्टपणे कळविलेले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश परीक्षा आणि प्रवेश प्रक्रियेच्या कामासाठी मे.कल्प टेक्नोलॉजी यांचा विचार न करता शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या नियंत्रणाखाली महाआयटी व महाऑनलाईन या सेवापुरवठादारांनी हाताळलेले स्पर्धा परीक्षांचे काम व त्यांची यंत्रणा विचारात घेऊन त्यांना उच्च शिक्षण, कृषी शिक्षण व वैद्यकिय शिक्षण अभ्यासक्रमांच्या संबंधित प्रवेश प्रक्रियेसाठी नियुक्ती करण्यात आली आहे असे प्राधिकरणास अवगत केले.<br><br>दिनांक १३/१२/२०१९ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे दिनांक १६/१२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्तामध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे,-<br><br>*".......... शासन निर्णयामधील तरतूदी विचार करता सन २०२०-२१ मधील प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे विहित वेळेत राबविण्याच्या दृष्टीने गतवर्षीच्याच सेवापुरवठादारांकडून गतवर्षीचे अटी-शर्ती व दराने अथवा दराबाबत वाटाघाटी करुन संबंधीत विभागाची प्रक्रिया राबविण्यात यावी असे गठित करण्यात आलेल्या समितीमधील उपस्थित सदस्यांमध्ये एकमत झाले."*<br><br>उपरोक्त तपशिलवार विवेचनानंतर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी घ्यावयाच्या प्रवेश परीक्षा व केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी नियुक्त केलेल्या सेवापुरवठादार/एजन्सी यांच्याशी केलेल्या सामंजस्य करारांना प्राधिकरणाची संमती देण्यता येत असुन या अनुषंगाने कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे सुचना देण्यता येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रिये बाबत अभ्यासक्रम निहाय नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीचा तपशील **प्रपत्र - ब** नुसार सोबत |



115

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | जोडण्यात येत आहे,-<br>१. सेवा पुरवठादार/एजन्सीसोबत केलेले सामंजस्य करार कार्यान्वियनासाठी संबंधित सेवा पुरवठादारास रितसर कळविण्यात यावेत.<br>२. सामंजस्य करारानुसार पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश परीक्षा आणि केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेबाबतची आवश्यक ती कार्यवाही आतापासुनचा सुरु करावी.<br>३. महाआयटी व महाऑनलाईन या सेवापुरवठादाराकडे पाच अभ्यासक्रमांचे काम सुपूर्त करण्यात आले आहे. यासंदर्भात त्या एजन्सीकडुन कार्यवाही सुरु आहे. तथापि संबंधित सेवापुरवठादाराने सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा राबविण्यासंदर्भात कितपत तयारी/पुर्तता केली आहे याबाबतची शाहनिशा करण्यासाठी सदर सेवा पुरवठादाराने दिनांक ०१/०४/२०२० रोजी प्राधिकरणासमोर सादरीकरण करावे. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने आवश्यक ती कार्यवाही करावी. |
| ८. | सीईटी सेल व प्राधिकरणाने पुर्ण करुन नियमित केलेल्या लेख्याबाबतची माहिती. | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने नियमित केलेल्या सन २०१६-१७ ते सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या लेख्याबाबतचे प्राधिकरणाने अवलोकन केले व याबाबत असा निर्णय घेतला की, सदर लेख्याबाबत प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांनी आपल्या सुचना अथवा अभिप्राय एक आठवडयाच्या कालावधीत सादर कराव्यात. सदस्यांनी सादर केलेल्या सुचना विचारात घेऊन पुढील निर्णय घेण्यता येईल. तथापि सदस्यांकडुन सुचना प्राप्त न झाल्यास कार्यालयाने सादर केलेले लेखे स्विकृत करण्यात येतील.<br>तसेच या संदर्भात खालील सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.<br>१. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आणि प्रवेश नियामक प्राधिकरणाने यापुढे दरवर्षी लेख्याबाबतचे त्रैमासिक अहवाल तयार करावेत.<br>२. प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ त्या त्या आर्थिक वर्षाचे अंतिम लेखे सादर करताना त्यासोबत पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रदेखील सादर करावे. |

(जे.पी. डांगे) मा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 1/5/20

**प्रपत्र – ब**

**शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मधील राज्य सीईटी कक्षाच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत नियुक्त सेवा पुरावठार / एजन्सिज यांचा तपशील**

| अ. क्र. | सेवापुरवठा दाराचे नाव | विभाग | अभ्यासक्रम | CET/CAP |
|---|---|---|---|---|
| १. | मे. एस.एम.वी. सिस्टिम प्रा.लि., मुंबई | वैद्यकीय, दंत व आयुष शिक्षण विभाग | NEET PG/MDS-2020 | CAP |
| | | | NEET UG-2020 | CAP |
| | | | PGP/PGO/PGASLP/M.Sc. (P&O) | CET/CAP |
| २. | मे.आय.वी.एस. प्रा. लि., मुंबई | आयुष शिक्षण | AIA-PGCET/ (Ayu./Hom./Unani) | CAP |
| ३. | महा–ऑनलाईन | वैद्यकीय | ANM/GNM Nursing | CET/CAP |
| ४. | मे. आय.वी.पी.एस. | तंत्र शिक्षण | MHT-CET-2020 | CET |
| | | | MBA/MMS-CET-2020 | CET |
| | | | MCA-CET-2020 | CET |
| | | | M.Arch. CET -2020 | CET |
| | | | M.HMCT-CET-2020 | CET |
| | | | B.HMCT-CET-2020 | CET |
| ५. | मे. फोर पिलर्स प्रा. लि., पुणे | तंत्र शिक्षण | MHT-CET-2020 | CAP |
| | | | MBA/MMS-CET-2020 | CAP |
| | | | MCA-CET-2020 | CAP |
| | | | M.Arch. CET -2020 | CAP |
| ६. | मे. सिन्थेसिस सोल्युशन प्रा.लि., पुणे | | M.HMCT-CET-2020 | CAP |
| | | | B.HMCT-CET-2020 | CAP |
| ७. | मे. आय.वी.पी.एस. | उच्च शिक्षण | M.Ed. / M.P.Ed./ B.Ed.- M.Ed. (Integrated) | CET |
| | | | B.Ed. / B.P.Ed. / B.A. - B.Ed/B.Sc. B.Ed. (Integrated) | CET |
| | | | LLB-5 Years (Integrated) / LLB- 3 Years | CET |
| ८. | मे. तलिस्मा कॉर्पोरेशन | उच्च शिक्षण | M.Ed. / M.P.Ed./ B.Ed.- M.Ed. (Integrated) / B.Ed. / B.P.Ed. / B.A. - B.Ed/B.Sc. B.Ed. (Integrated) | CAP |
| ९. | मे. महा–आयटी | उच्च शिक्षण | LLB-5 Years (Integrated) / LLB- 3 Years | CAP |
| १०. | मे. एस.एम.वी. सिस्टिम प्रा.लि., मुंबई | कला शिक्षण | MAH-AAC-CET-2020 | CET/CAP |
| ११. | मे. महा–ऑनलाईन | कृषी शिक्षण | MHT-CET-2020 | CET |
| १२. | मे. महा–आयटी | | | |

*******